# 'अपरांतक' कथास्पर्धेच्या निमित्ताने

**- डॉ. वासुदेव सावंत**

कोणत्याही लेखनस्पर्धेचा परिक्षक म्हणून काम करणे ही किती अवघड आणि जबाबदारीची गोष्ट असते याची जाणीव असूनही 'अपरांतक' ने आयोजित केलेल्या कथा-स्पर्धेचा एक परिक्षक म्हणून काम करण्याचे मान्य केले. गोमंतकातील सध्याच्या काळातील कथालेखनाची दिशा काय आहे, हे समजावून घेण्याची आणि नव्या गुणवत्तेचा शोध घेण्याचीही जिज्ञासा त्यामागे होती. ही जिज्ञासा बऱ्याच अंशाने पूर्ण झाली. गोव्यात नव्यानेच सुरु होत असलेल्या 'अपरांतक' या वाङ्मयीन नियतकालिकाने आपल्या पदार्पणातच कथा-स्पर्धा जाहीर करावी हे महत्त्वाचे वाटले. नव्या नियतकालिकाने आयोजित केलेल्या या कथा-स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद अगदी भरघोस नसला तरी उत्साहवर्धक होता. नियमितपणे कथालेखन करणाऱ्या कथाकारांबरोबरच नव्या, तरूण लेखकांनी या स्पर्धेत बहुसंख्येने भाग घेतला. नव्या लेखकांचा हा सहभाग गोमंतकीय कथेच्या भवितव्याच्या दृष्टीने आश्वासक वाटणारा असला तरी नवेंपणाच्या खुणाही बहुतांश कथांमधून दिसून येतात. काही कथा जरी पारितोषिक योग्य ठरलेल्या असल्या तरी एकूण कथांच्या वाचनाचा परिणाम पहाता काहीसे असमाधान जाणवत राहिले असे म्हणावे लागेल.

कथेचा विचार करतांना ती कोणता जीवनानुभव मांडू पहाते, तिचा आशय किंवा तिचे कथाबीज काय, हे कथाबीज किती सकस आहे ? हे पहाणे जसे महत्त्वाचे असते त्याचबरोबर या कथाबीजाचा विकास कसा केलेला आहे, जीवनानुभवाची मांडणी कशी केलेली आहे हेही पहावे लागते. या दोन्ही अंगांनी यशस्वी होऊन वाचकांच्या मनावर खोलवर परिणाम करणारी, उत्कृष्ट म्हणता येईल अशी कथा या स्पर्धेत आढळली नाही. आशयदृष्ट्या बहुतांश कथा सामान्य पातळीवरच्या, साचेबंद आशयसूत्रे मांडणाऱ्याच होत्या. जीवनातला एखादा अनुभव लेखकाच्या मनाला भिडलेला आहे आणि तो सांगण्यासाठी कथा लिहिलेली आहे. असे फारच थोड्या कथांच्या बाबतीत जाणवले. आजच्या गतिमान जीवनात वेगवेगळ्या क्षेत्रात माणसाचे माणूसपणच कसोटीला लावणाऱ्या असंख्य घटना घडत आहेत. पण समकालीन जीवनातील अशा घटनांचा वेध घेण्याचा प्रयत्न कथांतून दिसला नाही. काही अपवाद वगळता बहुतांश कथा आशयदृष्ट्या कौटुंबिक परिघापलिकडे गेलेल्या नव्हत्या. कथा लिहायची अशा उत्साहापोटीच काही कथा लिहिल्यासारख्या वाटल्या. त्यामुळे काही कथांना कथेचा आकारच प्राप्त झालेला नाही. 'निश्चय', 'वेगानं धावणारं प्रेम' या गोष्टीच्या किंवा वृत्तांताच्या पातळीवरच रहातात. 'फॅक्ट' पासून 'फिक्शन' च्या किंवा कथेच्या पातळीवर त्या जात नाहीत. 'अश्रू' ही सामान्य वाचकांच्या दृष्टीने भावोत्कट कथा होऊ शकली असती, पण एकच प्रसंग आणि तोही कृत्रिम व नाटकीपणाने मांडल्याने तिथलाही कथेचा नीट आकार येत नाही. 'चंदनाचा वृक्ष' सारखी कथाही केवळ व्यक्तिगत आठवणीच्या पलिकडे जाऊन व्यक्तिचित्रात्मक कथा असे रूप घेऊ शकत नाही.

यावरून असे दिसते की कथा-स्पर्धेत भाग घेणाऱ्या अनेक लेखकांना 'कथा' या साहित्यप्रकाराचीच अजून नीट जाण आलेली दिसत नाही. स्पर्धेसाठी आलेल्या काही कथा रचनेच्या दृष्टीने ठीकठाक असल्या तरी आशयाच्या दृष्टीने कुठेंतरी कमी पडलेल्या दिसतात. 'होरपळ' सारखी कथा फिल्मी वळणानेच

गेलेली दिसते. योगायोगाने प्रेम जमणे, वाढत जाणे, प्रेमात अडथळा, त्यामुळे प्रेमी जीवांची होरपळ अशा साचेबंद आशयसूत्रा बरोबरच वाचकांना विस्मयाचा धक्का देण्याचें रुढ तंत्रही ही कथा वापरते. लेखकाच्या सफाईदार लेखन-शैलीचा प्रत्यय 'जोरगत' या कथेतून येतो. पण कथेच्या आशयाला निश्चित केंद्र नसल्याने एकात्मिक परिणाम साधण्यात कथा कमी पडते. 'जोरगत' हे कथेचे शीर्षकही कथेचा आशय नीट व्यक्त करू शकत नाही. 'मीच खरी अभागीण' आणि 'बंदिनी' या दोन्ही कथा स्त्रीची व्यथा मांडणाऱ्या असल्या तरी 'बंदिनी' मधली स्त्रीचित्रणामागील लेखिकेची दृष्टी अधिक प्रगल्भ वाटते. 'मीच खरी अभागीण' कथेच्या नायिकेबद्दल वाचकांच्या मनात कारूण्य आणि सहानुभूती निर्माण करण्यात लेखिका यशस्वी झालेली असली तरी स्त्रीचा सासुरवास या नेहमीच्याच वळणावर ही कथा जाते. नायिकेच्या दु:खाचा कडेलोट दाखविण्यासाठी कथेच्या शेवटी तिचा नवरा अपघातात अचानक मरतो असे दाखवणे हे कृत्रिम आणि नाटकी वाटते. अशी कृत्रिमता आणि नाटकीपणा स्पर्धेसाठी आलेल्या अनेक कथांमधे आलेला आहे. 'मीच खरी अभागीण' च्या तुलनेत 'बंदिनी' कथेच स्त्री दु:खाचे चित्रण बरेचसे तटस्थपणे, फारसे भावुक न होता केले गेलेले आहे. कथानक व्यक्तिचित्रण, प्रसंगवर्णन आणि एकूणच कथनशैली या बाबतीत अन्य कथांच्या तुलनेत ती अधिक उजवी वाटते. घरची गरिबी किंवा सासरचा जाच यासारख्या कारणांनी या कथेतील नायिकेचे दु:ख निर्माण झालेले नाही. तिची व्यथा स्त्री-सुलभ आणि मानसिक पातळीवरची आहे. अंधश्रद्धेच्या आधारे ती आपल्या अस्वस्थतेवर मात करून समाधानी होते. एका स्वाभिमानी स्त्रीने जगण्यासाठी अंधश्रद्धेचा आधार घेण्याची ही लेखिकेला अस्वस्थ करणारी घटनाच या कथेची प्रेरणा आहे. लेखिकेला पडलेल्या प्रश्नांनी होणारा या कथेचा शेवट लेखिकेच्या दृष्टीकोणावर तर प्रकाश टाकतोच. पण वाचकालाही विचार करायला लावतो.

'बंदिनी' प्रमाणेच 'मुखवटा' ही कथाही वाचकाला अस्वस्थ करणारी एक प्रभावी कथा आहे. घरच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे, आई-वडिलाच्या दुर्लक्षामुळे एका कलावंत मुलाच्या जीवनाची कशी शोकात्मिका होते हे या कथेतून फार परिणामकारकपणे दाखविलेले आहे. कथेचे आशयसूत्र वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण असले तरी ते अधिक प्रभावीपणे व सामर्थ्याने मांडता आले असते. मांडणीच्या काही त्रुटी दाखवता येत असल्या तरी हा कथालेखक अधिक चांगले व सकस कथालेखन निश्चितच करु शकेल असा विश्वास मात्र ही कथा निर्माण करते.

पारितोषिक विजेत्या कथालेखकांचे अभिनंदन करताना कुठल्याही स्पर्धेतील परीक्षकांच्या निर्णयाबद्दल मतभेद होणे शक्य असते हे गृहीत धरलेले असले तरी परीक्षकांनी तटस्थ व वस्तुनिष्ठ दृष्टीतूनच या कथांची पारख केलेली आहे हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. शेवटी, स्पर्धेत भाग घेतलेल्या सर्वच लेखकांना सांगावेसे वाटते, की गेल्या चाळीस-पन्नास वर्षात मराठी कथेवर स्वत:ची नाममुद्रा उमटविणाऱ्या अनेक महत्वाच्या लेखकांच्या कथा ज़ास्तीत जास्त वाचल्या पाहिजेत. समकालीन मराठी कथेचे स्वरुप, तिच्यातील वळणे यांचा डोळसपणे अभ्यास केला पाहिचे. अशा वाचनातूनच कथेबद्दलची जाण अधिक प्रगल्भ होत जाईल. अनेक स्पर्धकांच्या बाबतीत अशा वाचनाची आणि व्यासंगाची उणीव असल्याचे जाणवले. नव्याने लेखन करणारे लेखक कुठल्यातरी आवडत्या लेखकांच्या वाङ्मयीन प्रभावाखाली लेखन करतात असे साधारणत: दिसते. पण असा प्रभाव पडण्याइतपतसुद्धा स्पर्धेतील काही लेखकांनी

वाचन केलेले नाही असे जाणवते. त्यामुळे स्पर्धेसाठी आलेल्या बहुतांश कथांवर साहित्याऐवजी चित्रपट आणि दूरदर्शनवरील मालिका यांचाच प्रभाव अधिक पडलेला आहे असे दिसून येते. प्रेयसीचा बाप अंडरवर्ल्ड डॉन आहे हे आकस्मिकपणे कळणे, मृत व्यक्तीच्या छायाचित्रापुढे उभे राहून रडत रडत कारुण्यपूर्ण संवाद म्हणणे, समोरच्या व्यक्तिचा गैरसमज होईल असे एखाद्या पात्राने हेतूतः बोलणे व हा गैरसमज नंतर काही क्षणातच नष्ट होणे यासारख्या अनेक घटनांतून हा प्रभाव दिसून येतो. या प्रभावामुळेच अनेक कथांमध्ये स्वाभाविकतेऐवजी कृत्रिमता व नाटकीपणा आलेला आहे. म्हणून चित्रपटांच्या किंवा मालिकांच्या प्रभावातून लेखकांनी मुक्त होणे आवश्यक आहे असे वाटते. त्यासाठी वाचन वाढविणे आवश्यक आहे.

साहित्याचे वाचन व व्यासंग ही जशी महत्वाची गोष्ट आहे त्याचप्रमाणे समकालीन जीवनाचे, आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटनांचे सूक्ष्म निरीक्षण करणे, त्याविषयी चिंतन करणे हे ही आवश्यक आहे. विशेषतः नव्या, तरुण लेखकांनी या दोन्ही गोष्टी नीट लक्षात घेतल्यास अधिक उत्तम व सकस कथालेखन ते करू शकतील. ◆◆◆